## पोलीस अधिक्षक औरंगाबाद ग्रामीण

| पोलीस अधिक्षक,कार्यालय | **प्रेस नोट** | दिनांक १७.०२.२०१७ १९.३० |
| --- | --- | --- |

**प्रति,**

**मा.संपादक**

**दैनिक ..........**

**विषय :—औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दाखल /उघडकीस गुन्हयांबाबत.**

यावदारे आपणास सुचित करण्यात येते की, औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दिनांक १७.०२.२०१७ रोजी खालील प्रमाणे गुन्हे दाखल /उघडकीस आले आहेत.

**०१) पोस्टे सिल्लोडशहरः—** गुरन I ४०/१७ कलम ३९५ ५०७ ५०६ भादवि नमुद गुन्हयाचे महिला फिर्यादी यांनी फिर्याद दिली की दिनांक १६.०२.२०१७ रोजी २१.००वा. दरम्यान यातील आरोपी नामे १) अंकुश तायडे २) योगेश नामदेवराव तायडे दोन्ही रा. अंधारी ता. सिल्लोड यांनी फिर्यादी व साक्षीदार त्यांचे पती दादाराव वानखेडे असे निवडणुक संपवुन पंचायत समिती क्वार्टर मध्ये आले असता त्यावेळी साक्षीदार सुनील पाटणी यांना फोनवर बोलत असताना आरोपी केशव तायडे यांनी सुनिल पाटणी यांच्याकडील फोन हिसकावुन साक्षीदार दादाराव वानखेडे यांना शिविगाळ केली व त्यांनंतर ०६ मिनीटांनी एक पांढरे रंगाचे सुमो मध्ये आरोपी हे फिर्यादी राहत असलेल्या कॉर्टर मध्ये घुसुन साक्षीदार दादाराव वानखेडे यांना लाथाबुक्यानी मारहाण केली व फिर्यादीचा दस्तीने गळा आवळण्याचा प्रयत्न केला व फिर्यादीच्या पर्स मधुन २०००/—रू. घेवुन गेले म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री. कापुरे पोउपनि पोस्टे सिल्लोडशहर हे करीत आहे.

**०२) पोस्टे खुलताबादः—** गुरन I ६४/१७ कलम ४५७ ३८० भादवि नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे कारभारी बाबुराव बोरसे वय ३५ वर्ष व्यवसाय शेती रा. सोनखेडा ता. खुलताबाद यांनी फिर्याद दिली की यातील कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे राहते घराचे कुलुप तोडुन घरात प्रवेश करून सोन्याचे दागीने किं. ४०,०००/—रू. व १५०००/—रू. नगदी असा एकुण ५५,०००/—रू.

चा माल चोरून नेले म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास सफौ गांगे पोस्टे खुलताबाद हे करीत आहे.

**०३) पोस्टे सिल्लोडग्रामिण:–** गुरन । ५८/१७ कलम ३८७ भादवि नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे सुनिलकुमार सुंदरलाल पाटणी वय ५६ वर्ष व्यवसाय व्यापारी रा. अंधारी ता. सिल्लोड यांनी फिर्यादिली की यातील आरोपी नामे दादाराव किसनराव वानखेडे रा. अंधारी ता. सिल्लोड याने त्याचे मोबाईल फोन वरून फिर्यादीचे मोबाईल वर फोन करून आरोपीने फिर्यादीस माझे निवडणुकी मध्ये ५० लाख रूपये खर्च झालेले आहे व मी जर तुमच्या मुळे निवडणुकी मध्ये हारलो तर मला २५ लाख रूपये द्या असे म्हणुन फोनद्वारे खंडणी मागुन पैसे दिले नाही तर तुला जिवंत मारून टाकीन अशी जिवे मारण्याची धमकी दिली म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोह/३९९ शिरस्कर पोस्टे सिल्लोडग्रामिण हे करीत आहे.

- **वाहतुक शाख व पोस्टे अंतर्गत कार्यवाही :–**

**दिनांक १७**.०२.२०१७ रोजी औरंगाबाद ग्रामीण जिल्हा वाहतुक शखा व पोस्टे अंतर्गत केलेलया अवैध प्रावासी वाहतुक – ०५ केसेस १००००/रू दंड, ईतर – १२९ केसेस २५८००/–दंड, अशा एकुण – १३४ केसेस ३५८००/रू दंड वसुल करन्यात आला आहे.

**स्वाक्षरीत**
**पोलीस अधिक्षक**
**औरंगाबाद ग्रामीण करीता**

**श्री पोह/५३८ नंदवंशी नियंत्रण कक्ष अधिकारी औरंगाबाद ग्रामीण**